

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. ना.
दा. क्र. १५९९२



IRBK-0115669

# ...ार ...चे नाटक



## विजय तेंडुलकर

वसंत सरवटे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा. क्र. ९५ दि. ७।१।७५



# चांभार चौकशीचे नाटक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
दा. क्र. ९५ ६६८ दि. ९।१।७५
वि. ना. ना.

तेंडुलकर

IRBK-0115669

...क मान...
...आवेगानिशी बाहेर फेकली...
...शी तेवढ्यात भांडू लागतात. र

मुखपृष्ठ व रेखाचित्रे : वसंत सरवटे

मौज प्रकाशन : १७९

प्रथमावृत्ती : जानेवारी, १९७०

© १९७०, विजय तेंडुलकर

किंमत एक रुपया

प्रयोगांच्या परवानगीसाठी
पत्ता : कुमार २, हनुमान रस्ता,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

मुद्रक : वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक : वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४

म. ग्रं. सं. ठाणे,
दा. क्र. ... नों. दि. ...
वि. ...



[पडदा उघडण्यापूर्वी एका पोराचे जोरदार भोकांड ऐकू येते. ते वेळोवेळी थांबून श्रेयनामावली चालू ठेवावी. ‘या नाटकात काम करणारे’ येथपासून ‘नाटक करणारी संस्था, लेखक’ वगैरेपर्यंत.

श्रेयनामावली चालू असतानाच पडदा वर जातो तेव्हा साधारणपणे राजपुत्राच्या पोशाखातला एक मुलगा बसून भयंकर जोरजोराने रडतो आहे. रडण्याचे आरोह-अवरोह घेतो आहे.

राजवाड्यावरची माणसे धावत येतात. यांत प्रधानमंत्री, विदूषक, हुजरे, राण्या वगैरे. सगळे अनवाणी. सगळे जोरजोराने विचारू लागतात, “काय झालं ?” “झालं तरी काय ?” “राजकुमार का रडताहेत ?”

आणि चौकशी करणाऱ्या सगळ्यांच्या हालचाली आहेत तशाच मध्येच थांबतात. चित्रासारखे रंगमंचावरचे दृश्य दिसते. शांतता. आणि शेवटची घोषणा: “चांभार-चौकशीचे नाटक.”

लगेच पुन्हा सगळा देखावा हलू लागतो, बोलू लागतो. राजकुमार रडतो का, याविषयी भयंकर खळबळ. विदूषक राजकुमाराचे सांत्वन करताना स्वतःचेच डोळे, नाक पुसतो. राजवैद्य, राजकुमाराने तोंड वासले की एकेक मात्रा आणि गुटी त्याच्या तोंडात सारतात. ती रडण्याच्या नव्या आवेगानिशी बाहेर फेकली जाताना त्यांना दिसते आणि ते हैराण. राण्या एकमेकींशी तेवढ्यात भांडू लागतात. राज-

कुमाराच्या रडण्यावरून प्रधानांना राजकुमाराचा रडण्याचा दम बघून दम्याचा जोरदार त्रास होऊ लागतो. त्यांना सावरण्यात हुजरे गुंततात. राजपुत्र रडतोच आहे. आणि राजा येतो, धावत येताना आल्या आल्याच रंगमंचावर घसरून आपटतो. सगळ्यांना हसू फुटते. राजा झाला तरी घसरून आपटताना वेगळा थोडाच दिसणार? राजाचा संताप. पण राजकुमार तसाच रडतो आहे.

वैतागलेला राजा राजकुमाराला गप्प करण्याचे काही प्रयत्न करून—उदाहरणार्थ, हात उगारणे, दातओठ खाणे, वगैरे—शेवटी आपल्या डोक्यावरचा भलामोठा मंदील राजकुमाराच्या डोक्यावर थापतो. त्यात राजकुमाराचा सबंध चेहरा गायब होतो. रडणेही ऐकू येईनासे होते. राजाला त्याच्या आकडेबाज मिशांना शोभण्याजोगा संतोष.]

*राजा* : (आता तब्येतीने प्रेक्षकांपुढे येऊन) **मी राजा, शप्पथ!** (मिशा सावरतो.) **आणि हा राजपुत्र म्हणजे राजाचा पुत्र म्हणजे—माझा पुत्र—पुत्र म्हणजे**—(बुचकळ्यात पडतो.) **काय करावं? या अंधेरनगरीच्या राजागिरीपायी शब्दार्थ पाठ करण्याला मुळी सवडच सापडत नाही. प्रधानजी, पुत्र म्हणजे कोण?**



(प्रधान दम्याची धाप घालीत राजपुत्राकडे बोट दाखवितात.)

**हो, पण कोण? हा कोण आमचा?**



*प्रधान* : (कसाबसा) **पुत्र.** (पुन्हा धाप.)

*राजा* : (कपाळावर हात मारून) **हे आमचे प्रधान! हे प्रधान म्हणजे हे राज्याचा कारभार पाहाणारे. म्हणजे कारभार आम्ही चालवतो आणि हे पाहातात— असे!** (धाप घालून दाखवून पुन्हा ओरडतो.) **कुणीतरी लवकर सांगा, पुत्र म्हणजे कोण? नाहीतर** (मिशी चावून) **प्रत्येकाला पन्नास उठाबशा काढायला लावतो!**

*प्रधान* : (कण्हून) **मुलगा.** (आणि छाती धरून बसतात खाली. दम्याची नवी धाप.)

*विदूषक* : (प्रेक्षकांना) **पन्नास उठाबशा काढायच्या म्हटल्यावरच आमच्या दमदार प्रधानजींचा दम वाढला!**

*राजा* : (प्रेक्षकांना) **तर, हा आमचा पुत्र म्हणजे मुलगा म्हणजे आम्ही याचे—**

*विदूषक* : (पलिकडच्या राजवैद्याच्या पाठीत धपाटा घालून) **बावा!**

*राजा* : **हा आमचा विदूषक. सगळ्या राज्यात असा हुषार दुसरा कोणी नाही!** (जाऊन राजपुत्राच्या तोंडावरचा मंदील काढून घाईने पुन्हा पूर्वीसारखा ठेवतो.) **रोज सकाळी उगवतो आणि संध्याकाळी मावळतो त्याला काय म्हणतात?**

*प्रेक्षकांतून एकदोघे* : **सूर्य! सूर्य!**

*राजा* : **म्हणजे त्याला** (दाखवीत) **अशा अशा रेघा असतात आणि चिक्कार तेजस्वी असतो—**

*प्रेक्षकांतून* : **सूर्य! सूर्य!**

*राजा* : **तर आमच्याकडे आधी एक सूर्य होता. तो उगवत पण नसे आणि मावळत पण नसे. त्याचा उजेड थोडा पण छान, गार गार असे. एकसारखा तो आकाशात असायचा. पिवळाधम्मक दिसायचा. रोज थोडा थोडा लहान नाहीतर मोठा व्हायचा...**

*प्रेक्षकांतून* : **चंद्र! चंद्र! तो चंद्र!**


६ *राजा* : (ऐकून) **म्हणजे आमचं चुकलंच म्हणायचं. पण जाऊ द्या. आता गेल्या काही दिवसांपासून हा नवाच सूर्य आमच्या आकाशात यायला लागला—भलता तापट! उजेड, डोळ्यांनी पाहावत नाही**

एवढा चिक्कार. नि पुन्हा तापला म्हणजे नुसता भाजून काढणारा. रोज सकाळी तो येतो आणि संध्याकाळी जातो. आधीच्याला सूर्य म्हणत होतो म्हणून आम्ही या नव्या पाहुण्याला चंद्र म्हणू लागलो.

*प्रेक्षकांतून* : सूर्य ! तो सूर्य !

[विदूषक प्रेक्षकांना गप्प करतो.]

*राजा* : बरं, तसं तर तसं. आपलं काय जातंय ? पण हा नवा चंद्र—नव्हे, सूर्य—आल्यापासून आमच्या अंधेरनगरी राज्यात चिक्कार उजेड पडू लागला आहे. म्हणजे आमच्या अंधेरनगरीची चक्क उजेडनगरीच झाली आहे ! त्यामुळं दिवसभर काय करावं तेच आम्हांला सुचेनासं झालंय. काही करावं म्हणू, तर अंधेर म्हणून नसतो ! सगळा उज्जेड ! वास ! राज्यातली सगळी अंदाधुंदीची घडी विस्कटून गेली असून जिकडेतिकडे शिस्त माजू लागलीय. लोकांना अन्यायाची चाड उरलेली नसून महामूर्ख माणसांना मान राहिलेला नाही. सगळा शहाण्यांचा कारभार होऊ बघतोय ! हे फार वाइट्ट आहे.



[विदूषक टाळ्या पिटतो आणि तोंडात बोटे घालून शिट्टी मारतो.]

तर आता आपण आमचा हा पुत्र म्हणजे मुलगा का रडतो ते बघू या.

(मंदील उचलून स्वतःच्या डोक्यावर ठेवतो. आणि भोकाड पसरलेल्या राजपुत्राला) **रडायला काय झालं रे कार्ट्या ? आं ? आं ? देऊ का— देऊ का एक ठेवून ? आं ? राज्यात उजेड पडू लागल्यापासून तुलासुद्धा अवदसा आठवली काय ?**

*राजपुत्र* : (भोकांड चालूच. दर वेळी नव्याने) **उजेड ! भाजतात ! पाय ! आमी नाई जा !**

*राजा* : **काय ? उजेड भाजतात पाय आमी नाही जा ?**

*प्रधान* : (दम्याची नवी धाप.) **सूर्य !** (एवढेच बोलू शकतात.)

*राणी* : **मी सांगते महाराज. हा माझा पुत्र. हा खेळायला वाड्याबाहेर गेला की त्याचे पाय उजेडानं भाजतात. म्हणून तो रडतोय.**

*विदूषक* : **म्हंजे तो रोज सकाळी उगवतो आणि संध्याकाळी मावळतो—अशा अशा रेघा असतात आणि चिक्कार तेजस्वी असतो—**

*राणी* : **बरोबर. त्याच्याच उजेडानं.**

*विदूषक* : **म्हणजे चंद्राच्या.**

*दोघेतिघे प्रेक्षक* : **चूक ! सूर्याच्या !**

*विदूषक* : (प्रेक्षकांना 'श्शू' करून राजाला) **सूर्याच्या. सूर्याच्याच.**



*राजा* : **पण घोड्यावर किंवा हत्तीवर न बसता या गाढवाच्या लेकाला सूर्याच्या उजेडात जायला सांगितलं कुणी ? आमचे नाही ते पाय**

पोळत? आम्ही तर शिकारीलासुद्धा जातो! आमचे हे प्रधानजी, सेनापती, मंत्री, हा विदूषक—

*राणी* : पण महाराज, तुमचे सर्वांचे पाय मोठे आहेत. माझ्या चिमुकल्याचे पाय कित्ती छोट्टे नि कोवळे कोवळे आहेत! जशा कमळाच्या पाकळ्या!

[राजपुत्र तेवढ्यात राजवैद्याला लाथ मारतो. राजवैद्य 'ओय' करतो.]

*विदूषक* : (प्रेक्षकांना) राजवैद्याच्या पाठीत एक कमळाची पाकळी बसली! (राजाला) शिवाय महाराज, घोड्यावर बसून घोडा घोडा कसा खेळणार? त्याला काठीच लागते! आणि हत्तीवर बसून लंगडी कशी घालणार? झालंच तर छप्पापाणी, गाऱ्यागाऱ्या भिंगोऱ्या, आट्यापाट्या, असं सगळं खेळायचं तर त्याला जमिनीवरच फिरावं लागतं.



*राजा* : मग हा नवा सूर्य नसतो तेव्हा खेळावं!

*राणी* : तेव्हा माझ्या छकुल्याला—

[राजपुत्र तिच्या बोटाला चावतो.]



आयाई! असं चावावं होय आईला? तर महाराज, हा नवा सूर्य नसतो तेव्हा माझ्या छकुल्याला हल्ली झोप येते.

*राजा* : आम्हांला पण येते. प्रधानजी, तुम्हांला?

*प्रधान* : (दम्याची नवी धाप) मला धाप येते.


*राजा* : विदूपक, तुला?

*विदूषक* : येते, म्हणजे धाप नव्हे, झोप.

*राजवैद्य* : मला पण येते. रात्रीची झोप आरोग्याला हितकर. मात्र तोंड उघडं टाकू नये, पोटात माशी जाते.
[राजपुत्र नव्याने भोकांड पसरतो.]

*राजा* : (ओरडून) स्टॉप! एस–टी–ओ–पी. (राजपुत्राच्या उघड्या तोंडात शेल्याचा बोळा करून कोंबतो. भोकांड ऐकू येईनासे होते. हात झटकून) तर याबद्दल लौकर काहीतरी केलंच पाहिजे. आमच्या पुत्राचे म्हणजेच मुलाचे पाय पोळणाऱ्या त्या नव्या सूर्याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. (ओरडून) प्रधानजी!

*प्रधान* : महाराज—(छाती गच्च धरून कापऱ्या सुरात) महाराज, ओरडू नका. माझा दमा वाढतो.



*राजा* : (खालच्या सुरात) **प्रधानजी, आमच्या मुलाचे पाय खेळताना पोळणार नाहीत, अशी काही जबरदस्त युक्ती काढा.**

*प्रधान* : **पण महाराज, माझा दमा—**

*राजा* : **राजवैद्य, प्रधानजींना तुम्ही दम्यावर औषध का देत नाही?**

*राजवैद्य* : **देतो. पण तेच नको म्हणतात. म्हणतात, दमा गेला तर महाराज कामापायी दम—**

[प्रधान त्याला चिमकुटा काढतो.]

**ओ—ओय!**

*राजा* : (प्रधानाला) **अस्सं! प्रधानजी, आमच्या पुत्राचे म्हणजेच मुलाचे पाय पोळतात त्यावर आजच्या आज उपाय काढा, नाहीतर आम्ही तुमचे कान छाटून ते तुमच्या डोक्याला चिकटवू आणि नाकाला टाके मारून त्याला सोंड डकवून हत्ती म्हणून तुमची धिंड काढू.**

[विदूषक खिदळत टाळ्या पिटतो.]

*प्रधान* : (दमा कोठच्या कोठे पळतो.) **नको! मी युक्ती काढतो!** (डोके खाजवू लागतो जोरजोराने.)

राजा : कोण आहे रे तिकडे ? सगळ्या मंत्र्यांना पण बोलवा. म्हणावं, राजपुत्राचे पाय खेळताना नव्या सूर्याच्या उजेडानं पोळतात; त्यावर लगेचच्या लगेच युक्ती काढा. नाहीतर मुलींचे पोशाख घालून राज्यातून फिरण्याची शिक्षा मिळेल !

[विदूषक जातो. मग वाद्यसंगीताच्या तालावर रांगेने सहा मुली त्यांच्याच पोशाखात किंवा सहा मुले मुलींच्या पोषाखांत स्टेजवरून फिरत निघून जातात. प्रत्येकाच्या डोक्यावर फेटा आणि नाकाखाली मिशी. आणि वाकड्या तोंडावर शरम, दुःख. मागोमाग विदूषक येऊन मजेत फिरतो नि मागे राहातो.]

राजा : मंत्र्यांना युक्ती सुचली नाही. आता प्रधानजी, तुम्ही तरी ! का बोलवू राज्यातल्या शिंप्याला ! (हाताने नाकाला टाके घालण्याची सूचना.)

प्रधान : (कळवळून) नको ! (मग एकदम सुचून) मी सांगतो ! आपण आभाळाला मांडव घालावा ! म्हणजे नव्या सूर्याचा उजेड त्या मांडवावर पडेल आणि जमीन तापणार नाही. जरा खर्च जास्त येईल, पण—

राजा : ठीक आहे ! कोण आहे रे तिकडे ? बांधकामाच्या प्रमुखांना कळवा की लागतील तितकी माणसं लावून मिळतील तितकी गोणपाटं, तरटं, तक्तपोश्या आणि अलवाणं विकत आणून सब्बंध आभाळाला एक भलाथोरला मांडव घाला ! लौकरात लौकर हे काम झालं पाहिजे. न झाल्यास लंगडी घालीत सगळ्या राज्याला राउंड मारण्याची शिक्षा मिळेल !



[विदूषक आत पळत जातो. वाद्यसंगीताच्या तालावर बांधकामप्रमुख लंगडी घालीत स्टेजवर येतो. मान शरमेने खाली घातलेली.]

*बांधकामप्रमुख* : (प्रेक्षकांना) **लंगडी घालून घालून पायांचे तुकडे पडायची वेळ आली! पण काय करणार! सगळे बांबू संपले, तरटं संपली, अलवाणं संपली, गोणपाटं संपली, काम करणारी माणसं पण संपली, पण आभाळ संपेच ना!**

[लंगडी घालीत निघून जातो. विदूषकाची हसून हसून मुरकुंडी वळते. तोही बांधकामप्रमुखामागून थोडी लंगडी घालतो. मग पुन्हा मागे थांबतो.]

*राजा* : **प्रधानजी, आभाळाला मांडव घालून होत नाही, आता काय करायचं? लवकर सांगा, नाही तर—**

*प्रधान* : (जोरजोराने डोके खाजवतो आहे. मग एकदम) **महाराज, सुचली! युक्ती सुचली! रामबाण युक्ती सुचली!**

*राजा* : **कोणती?**



*प्रधान :* नाहीच सुचली. पण सुचेल. (डोके खाजवतो आहे.) हां! महाराज, पाण्याचे भले मोठमोठे नळ तयार करून, सूर्यावर वाळ्याच्या थंडगार पाण्याचा चौफेर मारा करायचा. म्हणजे तो थंड राहील!

*राजा :* ठीक आहे. कोण आहे रे तिकडे? पाण्याच्या प्रमुखांना सांगा की मोठमोठे नळ तयार करून राज्यातलं सगळं पाणी वाळ्याचं करा आणि ते नळांनी सूर्यावर एकसारखं मारीत राहा. सूर्य थंड होईस्तोवर असं करा!

[विदूषक आत पळतो. तालावर नळप्रमुख आणि मागोमाग काही प्रजाजन रांगेने एक, एक पाऊल टाकीत स्टेजवर येतात. डोक्यांना, गळ्यांना मफलर. अंगे हुडहुडताहेत, थंडी वाजावी तशी. एका लयीत सगळे जोरदार शिंका देतात.]

*सगळे :* (गळ्यावर)
शिंक फुंकिली रणीं
[शिंका.]
वाजतात चौघडे
सूर्य तापला पहा, पाणि मारुं त्याकडे ॥
पाणि सर्व वर उडे

तसेंच खालि तें पडे
अंग भारि हुडहुडे, वाजतात दात्कडे ॥
[शिंका.]
सूर्य कांहि थंड होत नाहि उंच तो कुठे
सर्दिताप आम्हांला औषध कडुढाण तें
राजेसाहेब करिति हुकुम
प्रधानूजींत नाहि राम
[डोक्याला हात लावून आत काही नसल्याची खूण.]
शिक्षेचा काय नेम?
आँक्षि आँक्षि ओः खोक् खोक् पाणि मारुं बापडे ॥
[म्हणत, शिंकत, खोकत आत जातात. त्यांच्यामागून नाचणारा विदूषक तेवढा शेवटी मागे उरतो.]

*राजा* : प्रधानजी—

*प्रधान* : (डोके खाजवतो आहे. जोरदार विचार करतो आहे.)
**महाराज! थांबा! दुसरी युक्ती सुचली तर पाहातो.**

*राजा* : नौकर—

*प्रधान* : हो—(जोरदार प्रयत्न.)

*राजा* : प्रधानजी!

*प्रधान :* **मेलो—**(दुरुस्त करून) **नव्हे, सांगतो, सुचली !**

[तेवढ्यात विदूषक राजपुत्राच्या तोंडातला शेल्याचा बोळा ओढतो आणि राजपुत्राचे भोकांड पुन्हा पसरले जाते. गडबडीने विदूषक राजपुत्राचीच पाची बोटे त्याच्या तोंडात खुपसून ठेवतो. राजपुत्र गप्प.]


**महाराज, युक्ती सुचली! सेनापतींना बोलवा!**

[विदूषक पळत आत जातो तसाच; पण धडपडत कसाबसा पुन्हा परत येतो. पार विस्कटलेला. मागे मोठेमोठे आवाज. एक हाताने तलवारीचे पट्टे फिरवीत आणि तोंडाने बँडबाजा वाजवीत सेनापती येतो. स्टेजवर गडबडीने येऊन धडपडतो राजाच्या पायात.]

*सेनापती :* **बांधा बचंग पेरणीला आणि विसरा आपली हिरडसची बायकामुलं! बोला हरहर महादेव! दीन दीन! टिन टिन! ठ्यँ ठ्यँ–ठो–ठो—**

*राजा :* (ओरडून) **सेनापती—**

*सेनापती :* (कसेबसे हे आवरून धापा घालीत) **महाराज, सेवक लढाईला सज्ज आहे! सांगा, कुणाची कणीक तिंबायची, कढी पातळ करायची ते. ढिंग ढिंग–ठांग ठिंग–तबडाक ठो—**



म. ग्रं. सं. ठाणे, बालवाङ्मय शाखा,
दा. क्र. ३५६६ ग्रों दि १४-१-८०
वि. बा. वा

*राजा* : प्रधानजी, सांगा—

*प्रधान* : सांगतो.

*राजा* : सेनापती—

[सेनापती काल्पनिक लढाईत मग्न.]

अहो सेनापती—

[सेनापतीचे लक्ष नाही.]

से-ना-प-ती ! (त्याचे बकोट पकडून त्याला उभा करतो.) प्रधानजी काय म्हणतात तसं करा.

*प्रधान* : राज्यातल्या सगळ्या तोफा सूर्यावर डागा ! सूर्य नष्ट होईपर्यंत थांबू नका ! सगळा दारूगोळा वापरा, पण सूर्याला नष्ट करा !

*सेनापती* : धडाड धूम—ठीक आहे—हा निघालो—धाड् धडाड्—धडडऽऽऽ

[लढाई करीतच आत निघून जातो.

आत मोठमोठे धडाके उडू लागतात.

स्टेजवर प्रकाशाचे झोत पडतात.

राजा, प्रधान, विदूषक, राण्या, उभ्या जागी हादरतात, हेलपाटतात. एकमेकांच्या अंगावर कोलमडतात. आत ओरडा, मोठ्या आरोळ्या आणि वाद्यसंगीताच्या लयीत एकेकजण हेलपाटत गडबडत स्टेजवर येऊन पडतो. वाफेचे एक नळकांडेदेखील येणाऱ्या हातून स्टेजवर येते. शेवटी सेनापतीच येतो. पडतउठत, हेलपाटत आणि राजाला घट्ट मिठी मारून हुडहुडत राहातो.]


*राजा :* स—स—सेनापती—

*सेनापती :* म—म—महाराज! क—क—केवढा तडाखा—न—न—नव्हे—धडाका! भ—भ भीती वाटली! स—स—सगळे—ग—ग—ग गोळे खालीच येत होते! स-स-सूर्यावर-प-प-पोचलेच नाहीत! घ-घ घरं पडली, म-म माणसं जखमी झाली, ग-ग गावात-अ-अ-आगी लागल्या, स-स सूर्य-त-त-तसाच आहे! अ-ब-ब-ब-ब-ब-

*राजा :* (मुठी वळून, दातओठ खाऊन) प्रधानजी—

[प्रधानजी पुढचे हेरून वायुवेगाने धाव मारतात. मागोमाग राजा धावतो. त्यांच्यामागून सेनापती आणि विदूषक. मग इतरेजन. त्यांच्यापैकी एकटा राजपुत्र उरतो. तोंडात पाचही बोटे घालून कुचंबलेला रडवेला चेहरा. मग तोही चवड्यांवर दुडका चालत भोकांड पसरून निघून जातो सगळे गेले तिकडे. आणि एकजण रंगमंचावर येतो. हा शिदबा. अंगावर मळके, फाटके कपडे, काखोटीला किंवा पाठुंगळी एक बोचके.]

*शिदबा :* (प्रेक्षकांना) मी या राज्यातला नव्हे. आमच्या देशात माझा धंदा चालेनासा झाला म्हणून भटकत भटकत निघालो तो या राज्यात पोहोचलो. तर इथं काही वेगळंच चाललंय! छे बुवा! इथं राहाण्यात काहीच अर्थ दिसत नाही. इथले सगळे लोक अनवाणी!



आपण आपलं जावंच कसं अजून पलिकडच्या राज्यात.

[निघतो आणि दोन सैनिक धावत येऊन त्याला पकडतात.]

*पहिला सैनिक* : पकडा!

*दुसरा सैनिक* : धरा!

*पहिला सैनिक* : हा कुणी दुसऱ्या राज्यातला हेरच दिसतो.

*दुसरा सैनिक* : नक्कीच. इथल्या बातम्या काढायला आला असावा!

*पहिला सैनिक* : या अंधेरनगरी राज्यात हेर सापडला की त्याला चौकशी न करता तोफेच्या तोंडी देण्याचा सेनापतीसाहेबांचा आपल्याला हुकूमच आहे.

*दुसरा सैनिक* : तर मग या हेराला पण आपण तोफेच्या तोंडी देऊ!

*पहिला सैनिक* : ते बघ, तोफेचं तोंडच पडलंय तिथं!

*दुसरा सैनिक* : खरंच रे खरंच! म्हणजे कामच भागलं! हेरा, ये असा इकडे!

*शिदबा* : पण सैनिकसाहेब, मी हेरबीर नव्हे.

*पहिला सैनिक* : चूप! हेर नसलास तर चोर असशील!

*शिदबा* : मी चोर पण नव्हे.

*दुसरा सैनिक* : मग कुणीतरी असशीलच की नाही? मग झालं. राहा असा तोफेपुढं उभा! बांधा रे याला!

[दोघे त्याला शेल्याने नळकांड्याच्या तोंडाला बांधतात.]

*पहिला सैनिक* : अस्सं! आता आम्ही तुला तोफेच्या तोंडी देणार!

*शिदबा* : पण मी केलं काय?

*दुसरा सैनिक* : ते बी आम्हांला काही ठाऊक नाही. आमच्या राज्यात असली पद्धत नाही. इथं आधी शिक्षा, मग चौकशी.

*पहिला सैनिक* : कसा चेंडूसारखा उडेल आकाशात!

*दुसरा सैनिक* : वाहव्वा, वाहव्वा, चेंडू हा, सुंदर किति तरि खचीत हा!

*पहिला सैनिक* : याला पण सूर्यावरच उडवू या का रे?

*दुसरा सैनिक* : अरे, मग सूर्य आणखीच गरम होईल!

*पहिला सैनिक* : बाकी प्रधानजींची आता धडगतच नाही!

*दुसरा सैनिक* : शंभर वर्षे भरली म्हण त्यांची! राजेसाहेब केवढे रागावलेत त्यांच्यावर नि सेनापतींवर. हाती तर सापडू देत!

*पहिला सैनिक* : अरे, दहा हजार सोन्याच्या नाण्यांचं बक्षीस लावलंय राजेसाहेबांनी त्यांचं काम करील त्याला.

*दुसरा सैनिक* : दहा हजार म्हणजे किती रे?

*पहिला सैनिक* : अरे, म्हणजे एकावर चार पूज्यं!

*शिदबा* : (तोंडाला पाणी सुटून) एकावर चार पूज्यं?



*दुसरा सैनिक* : तू गप बस रे! तुला रे कशाला चौकशी?

*पहिला सैनिक* : आणखी थोड्याच वेळात या आमच्या तोफेतून मोठा आवाज येईल आणि तू उंच आभाळात कुठं तरी वर वर चाललेला असशील!

*दुसरा सैनिक* : सूर्य हाती लागला तर प्रयत्न कर. तेवढंच आमचं काम होऊन जाईल. एवढया तोफा डागल्या, पण सूर्याला कुठं ओरखडासुद्धा नाही !

*पहिला सैनिक* : आता त्याचा बंदोबस्त कसा करणार ?

*शिदबा* : बंदोबस्त ? कशाचा ? सूर्याचा ?

*दुसरा सैनिक* : हो, हो, सूर्याचा. तो नवीन उगवू लागलाय ना अलिकडे. खेळताना पाय पोळतात आमच्या राजपुत्राचे. सगळे हवालदील झाले आहेत.

*शिदबा* : पाय पोळतात म्हणून ?

*पहिला सैनिक* : असा काय विचारतोस अडाण्यासारखा पुन्हापुन्हा तेच तेच ? अरे, उन्हानं पाय नाही पोळणार ?

*दुसरा सैनिक* : वरं, खेळायचं तर घोड्यावर बसून थोडंच भागतं ?

*पहिला सैनिक* : तेवढं आभाळाला मांडव घालायचं जमायला हवं होतं.

*दुसरा सैनिक* : निदान पाण्याचे लोट मारून सूर्य थंड झाला असता थोडासा, तरी बरं होतं. पण फूस नाऱ्या !

*शिदबा* : पाण्याचे लोट मारून सूर्य थंड होणार होता ?

*पहिला सैनिक* : गप म्हटलं ना वावळटा तुला ! तुला का नसत्या चौकशा उगाच ?

*शिदबा* : (तोफेपासून सुट्टू पाहात) कितीचं बक्षीस आहे म्हणालात ? दहा हजार सोन्याच्या नाण्यांचं ?

*दुसरा सैनिक* : हां, उभा राहा! (पहिल्याला) भर रे वार आणि लगाव वत्ती! एकदा उरकून टाकू या काम. चल!

*पहिला सैनिक* : चल.

*शिद्बा* : थांवा! मी करतो ते काम!

*दुसरा सैनिक* : काम? कुठलं काम?

*शिद्बा* : मी राजपुत्राचे पाय पोळणार नाहीत अशी युक्ती सांगतो! मी सूर्याचा बंदोवस्त करतो!

*पहिला सैनिक* : तू? हा फाटकातुटका माणूस सूर्याचा बंदोबस्त कसला करणार?

*शिद्बा* : (वळवळत) मला आधी महाराजांकडे न्या. आधी न्या. न्या म्हणतो ना. मी प्रार्थना करतो तुमची, न्या...

*दुसरा सैनिक* : वैताग आहे हा माणूस म्हणजे! इतकं म्हणतोय तर चल नेऊ या. पाहू तरी काय करतो ते!

*पहिला सैनिक* : पाहू या. चला.

[शिद्बाला तोफेपासून सोडवून एका बाजूने नेतात आणि दुसऱ्या बाजूने पुढे प्रधान, मागोमाग सेनापती फुगडी घालीत आणि त्या मागोमाग हे पाहात राजवैद्य, विदूषक वगैरे येतात. सगळ्यांमागून राजपुत्र. तोंडावर राजाचा भला-थोरला मंदील. फुगडी झाल्यावर प्रधान आणि सेनापती दोघे, 'आता झिम्मा!' असे राजा ओरडताच झिम्मा नाचतात. मग कोंबडा चालू होतो. आणि शिद्बाला घेऊन दोघे सैनिक धावत येतात.]

*पहिला व दुसरा सैनिक* : महाराज, युक्ती! महाराज, युक्ती! (धापा घाल्ताहेत.)

*राजा* : युक्ती? कसली युक्ती? सरळ बोला, नाहीतर कोंवडा घालायला लावीन! काय आहे?

*पहिला सैनिक* : आ—आमचं काहीच नाही, महाराज—हा—याचंच आहे—म्हणजे याच्याकडे युक्ती आहे—सूर्याचा वंदोबस्त करण्याची. ते तुम्ही इनाम लावलंय—

*राजा* : याच्याकडे? ठीक आहे. प्रधानजी, सेनापती, जरा दम खा. काय रे लेका, कसली युक्ती आहे तुझ्याकडे सूर्याच्या वंदोवस्ताची? लौकर सांग. खोटं सांगशील तर दोरीवरच्या एक हजार उड्या मारायला लावीन!

[विदूषकाने मंदील उचलल्याने राजपुत्राचे भोकांड चालू. धाईने विदूषक मंदील त्याच्या डोक्यावर ठेवतो.]

*राजा* : सांग आधी!

*शिदबा* : हे बघा, मला घाबरवू नका. आधीच, तोफेच्या तोंडी हे मला देत होते तेव्हापासून माझा जीव थाऱ्यावर नाही, अन त्यात तुम्ही ओरडलात तर—

*राजा* : (ओरडून) ठीक आहे. नाही ओरडत. (आवाज उतरवून) पण युक्ती सांग एकदाची.

*शिद्बा* : **आधी आपण सर्वांनी डोळे मिटा.**

[सगळे डोळे मिटतात. शिद्बा पाठीवरचे बोचके काढतो. ते सोडून त्यातून शर्थीने दोन फाटक्या वहाणा काढतो.]

**हा बघा सूर्याच्या बंदोबस्ताचा उपाय!** (फाटक्या वहाणा दाखवतो.)

*राजा* : (खवळून) **एवढ्या मोठ्या सूर्यावर एवढा वीतभर उपाय? तोफांच्या माऱ्याला जो बधला नाही तो या कसल्या तरी टीचभर वस्तूंनी बधेल?**

*शिद्बा* : **होय, बधेल!** (राजपुत्राच्या पायात वहाणा घालतो.) **जा, खुशाल या उन्हात फिरून सूर्याच्या.**

[राजपुत्र वहाणांसकट पाय फरफटवीत जातो. येताना वहाणा डोक्यावर घेऊन उड्या मारीत येतो.]

*राजपुत्र* : (उड्या मारीत) **सूर्याची जिरली! आमचे पाय पोळतच नाहीत! आम्ही आता खूप खेळणार, मज्जा करणार!**

[सगळे त्या तालावर नाचू लागतात. राजा तेवढ्यात शिताफीने राजपुत्राच्या हातातून वहाणा हिसकावून त्या घालून स्वतः राउंड मारून येतो. मुद्रा थक्क.]



*राजा* : **कमाल आहे! केवढी अक्कल! केवढी हुशारी! वाहवा! वा वा वा वा वा! काय हो, तुमचं नाव काय?**



*शिद्बा* : मला शिद्बा चांभार म्हणतात. मी लांबच्या दुसऱ्या देशातला. रोजगार चालेना म्हणून इकडे आलो.

*राजा* : बरं झालं, आमच्या देशात आलात! आमच्या अंधेरनगरीचं भाग्यच! काय अक्कल! काय हुशारी! काय म्हणतात तुमच्या या वस्तूंना हो?

*शिद्बा* : त्यांना ना, व्हाणा म्हणतात, व्हाणा.

*राजा* : वा वा वा! आमच्या राज्यात उद्यापासून यांचे कारखाने काढायला लावतो! काय हुशारी! नाहीतर हे आमचे प्रधानजी!

[प्रधानाला दम्याची धाप.]

आजपासून तुम्हांला प्रधानाच्या कामावरून काढून टाकलंय आम्ही! तुम्ही ह्या असल्या छान छान वस्तू—नव्हे व्हाणा—तयार करा! आणि तुम्ही हो, कोण ते—शिद्बा चांभार, तुम्ही आजपासून आमचे प्रधानजी झालात!

[आत "शिद्बा चांभार प्रधानजीकी जय!"च्या घोषणा. तुतारी. राजा शिद्बाच्या डोक्यावर प्रधानाचा मुकुट ठेवतो व प्रधानाची पांढरी दाढी सोडवून ती शिद्बाला लावतो. नाचत

निघून जातो. मागोमाग राजपुत्र जातो. शिदबा भयंकर विनोदी दिसतो.]

*सेनापती* **नवे प्रधानजी ! काय आज्ञा आहे ?**

*शिदबा* (प्रधानाचे अवसान आणून) **सेनापती, आजपासून या राज्यात नसत्या चौकशा करील त्याला चांभारचौकशा करणारा असं म्हटलं जावं आणि सर्वांनी त्याला कोपरापास्नं नमस्कार करावा. मी नसत्या चौकशा केल्या म्हणून प्रधान झालो !**

[सेनापती कडक सलाम ठोकतो. जातो. सगळे जातात. रंगमंचावर एकटा शिदबा चांभार प्रधान उरतो.]

*शिदबा* (दाढी बाजूला करून डोळे मिचकावीत प्रेक्षकांना) **आपली जंमत कोणाला सांगू नका वरं का. अहो, वहाणांचा शोध माझा कुठला आलाय ? तुमच्या पण पायात बघा की ! पण अंधेरनगरी, चौपट राजा : आमचा फायदा, तुमची मज्जा—**

[हेच ठेवयावर म्हणत जाऊ लागतो आणि मध्येच अर्ध्यावर अडकतो. हलेनासा होतो.

मागून शब्द ऐकू येतात : "चांभारचौकशीचं नाटक". आणि शिदबा चांभाराची हालचाल पुन्हा चालू होऊन तो "अंधेरनगरी, चौपट राजा"च्या तालावर नाचत आत निघून जातो.

पडदा पडतो.]



म. प्र. सं. हा गो,
दा. क्र. १५६६९ तो. १९/११/७४
वि. को. तो. प.

सौ० सुलभा देशपांडे यांनी जनरल एज्युकेशन सोसायटीच्या गर्ल्स हायस्कूलतर्फे या नाटिकेचा प्रयोग १९६७ सालच्या कुमार कला केंद्राच्या आंतरशालेय स्पर्धेत केला आणि पहिल्या क्रमांकाचे यश मिळवले.

IRBK-0115669

## बालांसाठी नाटके

**जादूचा शंख** : सई परांजपे : ७५ पैसे
**सळो की पळो** : सई परांजपे : ८० पैसे
**शेपटीचा शाप** : सई परांजपे : १ रुपया
**झाली काय गंमत!** : सई परांजपे : १ रुपया

## बालांसाठी कादंबरी [आगामी]

हरवलेल्या खेळण्यांचे राज्य : सई परांजपे

ांभाराची
ावर नाचत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना   खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासीक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.